# कोविड -१९ आणि स्वच्छ दुध उत्पादन

## कोविड -१९ काय आहे?

कोविड -१९ हा एक विषाणुमुळे होणारा संसर्गजन्य आजार असुन काही महिन्यांपूर्वीपासून SARS –COV-2 ( सार्स कोरोना व्हायरस -२ ) च्या संसर्गामुळे होत आहे.

हया विषाणूचा संसर्ग सर्वप्रथम डिसेंबर -२०१९ मध्ये चीनच्या वुहान शहरात पसरला आणि तेथुन संपूर्ण जगात हया विषाणुचा प्रसार होऊन ह्या संसर्गजन्य आजाराने एका जागतिक महामारीचे रूप घेतले.

## कोविड -१९ आजाराची लक्षणे

डोकेदुखी, खोकला, ताप, थकवा, मांसपेशीत दु:ख, श्वास घेण्यास अडचण ही लक्षणे मुख्यत्वे आढळून येतात.

संसर्ग झाल्यावर ताप येवून कोरडा खोकला येतो. त्यानंतर श्वास घेण्यास अडचण व्हायला लागते आणि आजारी व्यक्तीला दवाखान्यात दाखल करावे लागते. परंतू सद्य:स्थितीत असेही आढळून आले आहे की काही रूग्णांमध्ये कुठलीही लक्षणे दिसुन येत नाहीत. त्याला लक्षणविरहित (Asymptomatic) आजार म्हणू शकतो.

## कोविड -१९ चा आजाराचा फैलाव कसा होतो ?

१. संक्रमित व्यक्तिच्या खोकला किंवा थुंकीद्वारे नाक व तोंडातुन निघालेल्या अतिसुक्ष्म थेंबांमध्ये हा विषाणु असतो. याच्या संपर्कात दुसरा व्यक्ति आल्यास त्याला हया विषाणूचा संसर्ग होऊन तो आजारी पडू शकतो.

२. संक्रमित व्यक्तिच्या खोकला किंवा थुंकीतुन विषाणु असलेला सुक्ष्म थेंब विविध पृष्ठ भागावर पडतो आणि अशा पृष्ठभागाला जर दुसऱ्या व्यक्तीनी स्पर्श केल्यास व त्याच हाताने आपल्या डोळे, नाक व तोंडाला स्पर्श केल्यास त्या व्यक्तीला या आजाराचा संसर्ग होवू शकतो.

## हया संसर्गापासून बचाव कसा करायाचा ?

### १. वारंवार हात धुणे

- आपले हात साबण व पाण्याने किमान २० सेकंदापर्यंत स्वच्छ धुणे, हात धुतांना तळहात, बोटांच्या मधील भाग, नखे, हातांचा मागचा भाग स्वच्छ करणे.
- अल्कोहोल युक्त (७०% पेक्षा अधिक अल्कोहोल असलेल्या) सॅनिटायझरचा प्रयोग करून हात स्वच्छ करणे.
- थोडया थोडया वेळाच्या अंतराने नियमीत हाताची स्वच्छता करणे .





### २ सामाजिक अंतर राखणे (सोशल डिस्टन्सिंग )

- सामाजिक अंतराचे पालन करून स्वत:मध्ये व इतर व्यक्तिंमध्ये कमीतकमी १ मीटर अंतर ठेवणे
- आपल्या डोळे, नाक व तोंडाला हाताने स्पर्श करू नये. आवश्यक वाटल्यास आधी आपले हात साबणाने स्वच्छ धूवून घ्यावे .
- नाक व तोंड फेसमास्क किंवा रूमालाने व्यवस्थित झाकुन ठेवणे.



सद्य:स्थितीत काही लोकांच्या मनात हा प्रश्न निर्माण होतो की दुध व दुग्धजन्य पदार्थांच्या सेवनातुन COVID – 19 चा आजार पसरू शकतो काय ?

हयाचे उत्तर " नाही " असे आहे.

दुध व दुग्धजन्य पदार्थांचे सेवन हे आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक आहे आणि स्वच्छ, उकळलेले दुध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या सेवनामुळे कोविड -१९ हा आजार पसरू शकत नाही.

## डेअरी फार्मिग (दुग्ध व्यवसाय) / दुग्ध प्रकिया केंद्रांसाठी काही निर्देश

- डेअरी फार्मवर कामावर प्रवेश करण्यापूर्वी आणि काम झाल्यावर परत जाताना प्रत्येक कर्मचाऱ्याच्या शरीराचे

तापमान (थर्मल स्क्रीनींग) संपर्क न होणाऱ्या थर्मामीटरद्वारे नोंद करणे आवश्यक आहे.

- कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर हात धुण्याची किंवा सॅनिटाईज करण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे.
- दुग्ध प्रकिया कक्षात प्रवेश करण्यापूर्वी स्वयंचलीत सॅनिटायझरची व्यवस्था असलेल्या कक्षातून जाण्याची व्यवस्था असावी.
- प्रक्षेत्रावर बाहेरून येणाऱ्या व्यक्तीला प्रवेश देवू नये.
- सर्व कर्मचाऱ्यांनी काम करतेवेळी पूर्ण बाहयांचे कपडे, हातमोजे, फेसमास्क व पायात शु कव्हर घालणेसुद्धा आवश्यक आहे.
- कर्मचाऱ्यांनी कार्यालयात येतांना सार्वजनिक परिवहनाचा वापर टाळावा. त्याऐवजी वैयक्तिक वाहनाचा वापर करावा.
- सामाजिक अंतर राखणे व इतर बचावात्मक धोरणांचा वापर करावा.

## दुध विक्रेत्यांसाठी उपाययोजना

- दुध विक्री करताना हातात हातमोजे घालावे तसेच सतत हात धुवावे / सॅनिटाईज करत राहावे.
- जर खुल्या दुधाची विक्री करत असाल तर दुध मोजण्यासाठी लांब हॅंडल असलेल्या मापाचा वापर करावा.
- दुसऱ्या व्यक्तिपासून सुरक्षित अंतर ठेवावे.
- आजारी वाटत असल्यास कामापासुन दुर रहावे.

- शक्यतो नगदी व्यवहार टाळून पैशाचे व्यवहार ऑनलाईन पद्तीने करावे.
- जर दुध वितरणाचे वाहन संसर्गबाधित परिसरात प्रवेश करत असेल तर दुसऱ्या ठिकाणी वापरापूर्वी संपूण वाहन पूर्णपणे सॅनिटाईज करण्याची दक्षता घ्यावी.



## दुध उपभोक्त्यांसाठी / ग्राहकांसाठी सुचना

- दुध व्यवस्थित उकळून घ्यावे तसेच अन्य दुग्धपदार्थ चांगले शिजवून घ्यावे व मगच सेवन करावे.
- दुधाचे पॅकेट किंवा पॅकेटबंद सामान डिटर्जंन्टच्या पाण्याने स्वच्छ धुवून घ्यावे.

## स्वच्छ व सुरक्षित दुध उत्पादनाबाबत महत्वपूर्ण गोष्टी

- ज्या जनावरापासून दुध उत्पादन घेण्यात येत आहे ते निरोगी असले पाहिजे.
- डेअरी फार्मचे वातावरण निर्जंतूक असले पाहिजे .
- दुध काढण्याच्या परिसराची स्वच्छता ठेवण्याबाबत विशेष काळजी घेतली पाहिजे .

- दुध काढणे, दुग्ध प्रकिया व दुध संकलनासाठी आवश्यक यंत्र व भांडी स्वच्छ, निर्जंतूक केलेली असली पाहिजे.
- प्रक्रिया कक्षातील फरशी, दरवाजे, खिडक्या व त्यांच्या कडया इ. सॅनिटाईज करून त्या स्वच्छ ठेवणं आवश्यक आहे.
- दुधाची तथा दुग्धपदार्थाची वैज्ञानिक पद्धतीने साठवणुक करावी. तसेच स्वच्छतेचे कटाक्षाने पालन करावे.


**मार्गदर्शन-**
**डॉ. पी. टी. जाधव**
संचालक
विस्तार शिक्षण
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर

**संकलन-**
**डॉ. गितांजली ढुमे**
तांत्रिक अधिकारी
विस्तार शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
**डॉ. सारिपूत लांडगे**
तांत्रिक अधिकारी
विस्तार शिक्षण संचालनालय
महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर



**संदर्भ-**
भाकृअनुप-भारतीय पशु चिकित्सा अनुसंधान संस्थान, इज्जतनगर